# राशिभविष्य - मार्च, २०१८.

**दादा दामले ( dadadamle@gmail.com)**

==================================================================

**(१) मेष -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय अस्थिर, चंचल, लहरी असा घडला असल्याचे जाणवते. त्यामुळे कोणाचाही धाक, दडपण, कोणी सांगितलेल्या उपदेशाच्या चार गोष्टी सहन होत नसल्या पाहिजेत. उलट उपदेश करणाराचा अपमानच केला जात असेल. या राशीची लहान मुले तर अत्यंत हूड, खोडकर व व्रात्य झाली असण्याची शक्यता जाणवते. पण ज्या हर्षलमुळे असा स्वभाव होतो तोच हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. मात्र या महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रहामुळे वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभेल व सप्ताह अतिशय आनंदात जाईल. पण राहूमुळे या राशीच्या मंडळींच्या कौटुंबिक सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात काहीही कारणाने मनस्थिती अस्वस्थ राहणे संभवते. तसेच मनाविरुद्ध काही घडणे, आर्थिक चिंता निर्माण होणे अशापैकी कारणानी असह्य मनस्ताप होणे संभवते. जपा. पण शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. कुमार्गी मित्रांपासून दूर राहा. या राशीच्या युवकांनी आहे त्या नोकरीतच मनापासून काम करावे. नवे काही करण्याचा विचारही करू नये. स्वतंत्र व्यापार वा व्यवसाय कराल तर नुकसानच होईल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळामुळे उष्णता विकारांचा आजार त्रस्त करील. शिवाय एखादा अपघात होऊन हाडमोड होणेही संभवते. जपा. पहिल्या सप्ताहानंतर शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास होणे संभवते. जपा. ज्यांचे प्रेमसंबंध असतील ते दृढ होतील. काहींना विवाह योगही संभवतो. तसेच काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकूल होईल.

**(2) वृषभ -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळीना एखादे उच्च पद मिळणे संभवते. काहींच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. आरोग्य उत्तम राहील. स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती राहील. पण मनोविकार तज्ज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. बुध-शुक्र-रवि हे तीनही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात इच्छा पूर्ण करतील, सुख-शांति-समाधान देतील. असे असले तरी सतत सावधानतेने आचरण करूनच आनंद लुटा. कारण व्यय स्थानी असलेला हर्षल त्रास, अडचणी, जिवावरचे प्रसंग निर्माण करण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला राहू अनुकुल होणार असला तरी तो बंधुसुखात बाधा निर्माण करील. जपा. गुरु ग्रहामुळे आरोग्य उत्तम राहील व बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना प्रगतिकारक व लाभदायक होईल. “

वरून कीर्तन , आतून तमाशा “ अशा प्रकारचे ढोंगी आचरण होणे संभवते. त्याचा तुम्हालाच त्रास होईल. जपा. या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात विविध कारणानी बाधा येणे संभवते. जपा. दाम्पत्य जीवनात दोघातील वाद, मतभेद, जीवनसाथीचे अनारोग्य अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळणार नाही. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी मतभेद, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. शनि ग्रह प्रतिकुल असून त्याच्यामुळे घरात असमाधानकारक घटना घडणे, अनारोग्य होणे, अपेक्षाभंग होणे असे काही घडू शकेल. शिवाय महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहापासून शनि-मंगळ एकत्र येत असल्याने अपघात भय संभवते. जपा. हाडमोड होणेही संभवते. वीज, पाणी यापासून धोका आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्य, मानसिक ताण, काहींना पद अवनती सहन करावी लागेल. तसेच काहींना वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. मोठ्या, अनुभवी, अधिकारी मंडळींच्या ओळखी होणे संभवते. काहींना हाती घेतलेल्या जबाबदारीत यश मिळेल. काहींच्या इच्छा अपेक्षा पूर्ण होतील. काहींना धनलाभ होणे संभवते. कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र आपल्या कार्यात अडथळे, अडचणी येत असल्याचा अनुभव येईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर सर्व काही मनासारखे घडेल व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. कौटुंबिक सुख लाभेल. काहींचे नव्याने प्रेमसंबंध निर्माण होतील. काहींना अर्थलाभ होणेही संभवते. राहू-केतू प्रतिकुल असून राहूमुळे काही मंडळींना आर्थिक समस्या त्रस्त करतील. कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होईल. केतूमुळे काहींना त्वचा आजाराचा त्रास सहन करावा लागेल. तर काहींना रक्तविकार किंवा मुखदंत विकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी शनि-मंगळ आहेत त्यामुळे दाम्पत्य जीवनात अनारोग्य, दोघांतील वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी मनस्तापच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. भागीदारीत व्यापार=व्यवसाय असणारांनी गैरसमज, वाद, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. यांत्रिक तांत्रिक नोकरी व्यवसाय असणारांना महिन्याचा प्रथम सप्ताहच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. पण चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ बऱ्याच प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(४) कर्क -** कर्क या चंद्राच्या मालकीच्या राशीतच राहू असल्याने सतत मनस्ताप देणाऱ्या, अपमान होणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे मानसिक संताप होईल. अस्वस्थ मनस्थितीत नकळत इजा, दुखापती होतात. जपा. शिवाय त्यामुळे अनारोग्य होऊन वातविकाराचा आजार होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी गुरु ग्रह असल्यामुळे कौटुंबिक सुख लाभेल, काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहारही मनासारखे होतील; पण नातेवाईक मंडळींपैकी कोणाकडून मनस्ताप दिला जाणेही संभवते. संततीपैकी कोणाची आचरणविषयक समस्या, कोणाची

आरोग्यविषयक समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. दिनांक ७ पासून पंचम स्थानी असलेला मंगळ षष्ठ स्थानी गेल्यावर अनारोग्यकारक होईल व त्यामुळे ताप येणे, इजा होणे, अंगावर फोड येणे, रक्तविकार बळावणे, अपप्रचाराचा त्रास होणे अशा पैकी कारणांनी अनारोग्य होणे संभवते. हृदय विकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. पण याच स्थानी असलेल्या शनि-मंगळामुळे यांत्रिक-तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना व चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात प्रगतीत थोडे अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. सप्तम स्थानी असलेल्या केतुमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल होणार असून मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. पाण्यापासून धोका असल्यामुळे व विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका . पण शुक्रामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल. तसेच हनुमान उपासनाही अनुकुल होईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना शारीरिक-मानसिक आरोग्याचे दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. मनासारखे काही न घडणे, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, पोटाचे अनारोग्य होणे, रोगप्रतिकार शक्ती कमी होणे अशापैकी कारणांनी सर्व प्रकारचे अनारोग्य सहन करावे लागेलसे दिसते. त्यात भर म्हणून संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. जपा. तसेच सप्तम स्थानी रवि ग्रहासह नेपच्यून असल्याने वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे महिन्याच्या प्रथम सप्ताहात असमाधानकारक घटना, गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. नंतरच्या काळात संततिविषयक समस्या त्रस्त करतील. पण कोणताही बौद्धिक व्यवसाय, वकिली-सल्लागारी व्यवसाय, साहित्य निर्मिती करणारे लेखक, यांत्रिकतांत्रिक नोकरी व्यवसाय व वैद्यकीय व्यवसाय असणारांना तसेच ज्यांचा इतर धर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. पण गुरु ग्रहामुळे भावंडाकडून त्रास होणे संभवते. जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या काही मंडळीना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, पगतिकारक व यशदायक होईल. काहींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग संभवतात. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर काहींना थोरकृपा तर काहीना गुरुकृपा प्राप्त होईल. काहींना कीर्तिप्रसिद्धी प्राप्त होईल व सुखसमाधान लाभेल. राहूमुळे काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर गायत्री उपासना अनुकूल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे गायत्रीमंत्राचा कमीत कमी बारा वेळा जप करा,

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना काही बाबतीत अनुकुल तर काही बाबतीत प्रतिकुल असे संमिश्र अनुभव देणारा या महिन्याचा काळ असणार आहे. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने काही मनोनुकुल घटना घडतील; तर राहू-केतू , शनि- मंगळ-हर्षल हे ग्रह मिळालेल्या सुखसमाधानात बाधा निर्माण करण्याची दाट शक्यता दिसते. महिन्याच्या प्रथम सप्ताहात मंगळ ग्रह अनुकुल

होईल; तर नंतर तोच शनि ग्राहासह गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. जपा. गुरु ग्रह कौटुंबिक सुख, अर्थलाभ आदी जेवढे देता येईल तेवढे देईल; पण मंगळ-शनि हे ग्रह वाद, गैरसमज, असमाधानकारक घटना, अनारोग्य निर्माण करून मिळणाऱ्या सुखसमाधानात बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न करतील. जपा. राहू-केतू हे दोघे विविध कारणांनी संततिसुखात बाधा आणतील. राहू या राशीच्या अधिकारी मंडळींना अधिकाराचा गैर वापर करण्यास व वाममार्ग धन मिळविण्यास प्रवृत्त करील. जपा. मोहाला बळी पडू नका. जुगार खेळू नका. पण केतू अनुकुल असला तरी पाप ग्रहांच्या योगात अनारोग्य निर्माण करील. तसेच दोन्ही राहू-केतू हे ग्रह विविध कारणांनी संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. त्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणेही संभवते. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होणार असला तरी महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात काहींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ तर काहींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. काळ अनुकूल असला तरी सतत सावधानतेने आचरण करा. कारण अपघात भय आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या ज्या मंडळींचे बौद्धिक कार्यक्षेत्र आहे अशांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगति कारक व यशदायक होईल. साहित्यिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. बौद्धिक संशोधन कार्यासही काळ अनुकुल होईल. शिवाय शारीरिक आरोग्यही बिघडण्याची शक्यता दिसत नाही. पण या राशीच्या धनस्थानी असलेला मंगळ महिन्याच्या पहिल्या सप्ताहात आर्थिक समस्या निर्माण करण्याची शक्यता आहे. त्यामुळे मानसिक आरोग्य बिघडू शकेल. जपा. नंतर मंगळ अनुकुल झाल्यावर हिम्मत वाढेल, महत्त्वाकांक्षा वाढेल, व औषध विक्रेते, वैद्यकीय व्यवसाय असणारे, यांत्रिकतांत्रिक कार्यक्षेत्र असणारे, कोळसा, लोखंड व्यापारी अशांना उर्वरित काळ अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळींना अनुकुल व मनाला रुचेल अशी नोकरी मिळेल किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. केतूमुळे घरात वा बाहेर कोणाशी पटणार नाही. शिवाय कसली तरी चिंता त्रस्त करील. विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरच्या खाद्यपदार्थाचे सेवन करू नका. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण हृदयविकार असणारांनी मनस्थिती सतत शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. कारण हितशत्रूचा त्रास होणे संभवते. शुक्र ग्रह अनुकुल असल्यामुळे सर्व प्रकारच्या कलात्मक क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ आनंददायक व यशदायक होईल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. पण सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींपैकी काहीना बढती, अधिकारपद असे काही मिळू शकेल. काहींचा सन्मान होणेही संभवते. श्रद्धा असेल तर देवी उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ आरसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. त्यात शनि ग्रहाच्या साडेसातीची भर असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी आपल्या

अविचारी, संतापी, अहंकारी मनोबुद्धीला लगाम घालून व सतत नम्रतेचे आचरण करूनच प्रतिकुल काळ व्यतीत करावा. तेच सुखाचे होईल. नपेक्षा असह्य मनस्ताप, आर्थिक नुकसान व अनारोग्यच सहन करावे लागेल. मनाला भावणाऱ्या एखाद्या कलेच्या किंवा छंदाच्या नादात कालक्रमणा करता आली तर खूपच सुखाचे होईल. शास्त्रीय संशोधन कार्यास हर्षल अनुकुल असला तरी अति विचाराने डोकेदुखीचा आजार त्रस्त करील. क्वचित कोणास मेंदूविकाराचा आजार होणेही संभवते, जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना नोकरीत सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांना सामोरे जावे लागेल. नियोजित कार्यात सतत दिरंगाई, अडथळे, विरोध सहन करावा लागेल. वरीष्ठांचा जाच सहन करावा लागेल. शिवाय कौटुंबिक जीवनातही कोणाचे अनारोग्य, कोणाचे गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी वैतागून जाल. म्हणून सतत मनावर संयम ठेवून व जिभेला लगाम घालूनच आचरण करा. महिन्याच्या पहिल्या साप्ताहानंतर धनस्थानी व कुटुंब स्थानी शनि-मंगळ एकत्र येतील तेव्हा तर कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, अनपेक्षितपणे येणारी आर्थिक जबाबदारी कशी पूर्ण करावयाची याची चिंता लागणे, त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावून अनारोग्य होणे संभवते. जपा. प्रवासाचे योग येतील; पण प्रवासात मनस्ताप होणार नाही व आर्थिक नुकसान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. विविध कारणांनी संततिसुखातही बाधा येणे संभवते. अशी एकूण परिस्थिती होणे संभवत असल्यामुळे मन:शांतीसाठी व कौटुंबिक सुखासाठी आध्यात्मिक उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे "हनुमानचालीसा " स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना शारीरिक-मानसिक मनस्ताप देणारा या महिन्याचा काळ आहे. तो मन व बुद्धी व जिभेवर ताबा ठेवून व्यतीत केलात तर अनारोग्य फारसे होणार नाही व सध्या भावनाशील मनस्थिती झाली असल्यास मानसिक अनारोग्यही सहन करणे सहज शक्य होईल. कारण शनि-मंगळ हे शत्रू ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे नियोजित कार्यात अडथळे येणे, मनस्ताप होणे, घरीदारी वाद, भांडणे होणे, काही कारणाने मानहानी होणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, हट्टी स्वभाव असेल व बौद्धिक अहंकार असेल व सतत मानसन्मानाची अपेक्षा कराल तर या उलटच अनुभव येतील व त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. अशा परिस्थितीतही महिन्याच्या पूर्वार्धात रवि-गुरु शुभ व लाभयोगकारक असल्यामुळे व या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार असल्याने त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. उत्तरार्धात घरीदारी मनाविरुद्ध घटनाच घडण्याची शक्यता दिसते. नेपच्यून आध्यात्मिक उपासनेसाठी अनुकुल असल्यामुळे आध्यात्मिक उपासनेत मन गुंतवल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल व अनारोग्यही होणार नाही. शिवाय गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना जलप्रवासाची किंवा परदेशगमनाची संधीही मिळू शकेल. शुक्र कला क्षेत्रासाठी अनुकुल असल्यामुळे या राशीच्या सर्व प्रकारच्या गायन-वादन, चित्रकला-फोटोग्राफी, किंवा अन्य कला क्षेत्रात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल व मानसिक सुख-शांति-समाधान लाभेल. हाच शुक्र शेती व्यवसाय असणारांनाही लाभदायक होईल. गुरु-हर्षल शुभ योगामुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना आपल्या कार्यक्षेत्रात उच्च प्रगती साधणे व यशस्वी होणे शक्य होईल. बुध ग्रहाच्या अनुकुलतेने गृहसौख्य व मित्रसुख लाभेल, पण तो आर्थिक नुकसानीसही कारणीभूत होण्याची शक्यता आहे. जपा. अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे

जन्मकुंडलीत योग असेल तर काही भाग्यवान मंडळीना अचानक धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या बौद्धिक व बौद्धिक संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना तसेच या राशीच्या लेखकांना व साहित्य निर्मिती करणाऱ्या गंथ प्रकाशकांना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे त्यांनी महिन्याच्या उत्तरार्धात जे काय साध्य करावयाचे त्याची योजना पूर्वार्धात तयार करून ठेवावी. म्हणजे वेळ वाचेल व अपेक्षित ते साध्य करणे सोयीचे होईल. या संपूर्ण महिन्याच्या काळात विविध कारणांनी आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. तसेच त्यात भर म्हणून आर्थिक नुकसान होणे, आर्थिक घोटाळे होणे, अनपेक्षितपणे नव्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याचा प्रसंग ओढवणे अशापैकी घटना घडण्याची दाट शक्यता दिसते. त्यामुळे शारीरिक उष्णता विकार बळावतील व विशेष करून डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. छुप्या शत्रूचा त्रास होणे संभवते. म्हणून सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेनेच करा. नपेक्षा आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता आहे. या राशीच्या काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना धनलाभ , प्रतिष्ठा असे काही प्राप्त होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री ग्राहकाकडूनच अधिक अर्थलाभ होईल. शेती व्यवसाय असणारांना महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात विशेष अर्थलाभ होणे संभवते. अखेरचा सप्ताह या राशीच्या सर्वांनाच समाधानकारक असल्याचा अनुभव येईल. पण स्वभाव चंचल, विक्षिप्त असा झाला तर मात्र कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, सतत तक्रारी करत राहाल व त्यामुळे गृहसौख्यात बाधा निर्माण होईल. जपा. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आणि त्यात शनि-मंगळ हे दोन्ही शत्रू ग्रह प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी सहनशील बनून सतत सावधानतेने आचरण करणेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन शांत ठेवील. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अत्यंत भावनाशील झाला असून मनस्थिती अति कोमल झाली असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असाव्यात असे वाटते. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच मन उदास होऊन लगेच गहरे नैराश्य येत असावे असे वाटते. शिवाय मनस्ताप जनक असे काहीही घडले तरी असह्य संताप येत असावा. अशामुळे थकवा येऊन शारीरिक अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. रक्तविकार, हृदयविकार असे आजार असणारांनी तर मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून सतत शांत राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बुध -शुक्र अनुकुल असल्याने महिन्याच्या पूर्वार्धात अपेक्षित कौटुंबिक सुखसमाधान मिळेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह धनस्थानी गेल्यावर आर्थिक समस्या त्रस्त करतीलसे दिसते. शिवाय आर्थिक नुकसान होणेही संभवते. जपा. त्यामुळे वादविवाद, भांडणे झाल्यास शारीरिक उष्णता भडकून नेत्रविकार त्रस्त करील. जपा. या राशीच्या ज्या मंडळीना उच्च बौद्धिक क्षमता , आकलन शक्ती व स्मरणशक्ती लाभली आहे आणि जे बौद्धिक वा शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न आहेत त्यांना या महिन्याचा काळ अनुकुल,

प्रगतिकारक व यशदायक होईल. पण त्यांना खंबीर मनस्थिती राखणे जमले पाहिजे. या महिन्याचा अखेरचा सप्ताह
या राशीच्या बहुसंख्य मंडळींना सुखदायक जाईल व काहींना विविध प्रकारचे लाभ होतील. राहूमुळे व्यावसायिक शत्रूवर विजय मिळवाल. ज्यांचा अन्य जाति-धर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध आहे, अशांना अशा संबंधामुळे लाभ होईल. पण काहींना या राहूमुळे पोटदुखीचा आजार त्रस्त करील. जपा. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे गुरुकृपा प्राप्त होईल. गुरु-शनि लाभयोगामुळे शुभ घटना घडतील, अर्थलाभ होईल, पण शनीमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. दशम स्थानी असलेल्या मंगळामुळे स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या चिंताग्रस्त असावी, असे दिसते. तसेच मन व बुद्धी अस्वस्थ, चंचल असल्यामुळे अविचाराने आचरण होत असावे, असे वाटते. पण व्यय स्थानी असलेला नेपच्यून गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. पण हर्षलमुळे जिभेचा उपयोग अविचाराने वाटेल तशी फटकेबाजी करून समोरच्याचा अपमान करण्यातच होत असावा, असे वाटते. त्यामुळे आचरणही विक्षिप्तपणाचेच होत असले पाहिजे. आपल्या फटकळ व अविचारी बोलण्याने माणसे अकारण दुखावली जात असतील. अशा वागण्यामुळे तुम्हाला स्वत:लाच असह्य त्रास सहन करावा लागत असेल, असे वाटते. असे असले तरी धनस्थानी हर्षलसह असलेल्या शुक्रामुळे कौटुंबिक परिस्थिती काही प्रमाणात सुखकारक घडत असेल. कौटुंबिक प्रगतीही होत असेल. पण या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना मात्र काळ प्रतिकुल व मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या ज्या मंडळींचा दलाली-कमिशनवर व्यवसाय असेल त्यांना काळ लाभदायक होईल. पण हाच राहू विविध कारणांनी संततिसुखात बाधा निर्माण करील. जपा. अष्टम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत त्यांच्यापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने धनलाभ होणेही संभवते. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास व मानहानी होणे संभवते. जपा. दुसऱ्या सप्ताहापासून शनि-मंगळ एकत्र असल्यामुळे नोकरी-व्यवसायात खळबळ जनक घटना घडतील. जपा. नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. काहींना हातचे सोडून नवीन काही सुरू करण्याची उर्मी येईल; पण त्यांनी तसे काही करू नये. आहे ती नोकरीच करावी. प्रवासाचे योग संभवतात. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====